# ठाणे जिल्हा झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी सरकारने विशेष धोरण आखावे!

(मुलाखत पान ३ वर)

## भाजपचे कृष्णा पाटील यांनी विशेष मुलाखतीत मांडली भूमिका

एसआरए आणि क्लस्टर योजनेत समानता आणल्यास लाखो ठाणेकरांना दिलासा, कृष्णा पाटील यांचा पाठपुरावा सुरू!


दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com





आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com


▶ वर्ष-२ ■ अंक-१५ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १४ नोव्हेंबर २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज आयोजित

दिवा शहरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी

दिवा शहर मर्यादित

## चित्रकला स्पर्धा २०२२

**प्रवेश निःशुल्क**

- ही चित्रकला स्पर्धा दोन गटांत असेल.
- दिवा शहर व दिवा प्रभाग समिती हद्दीतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.
- भाग घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना दिवा न्यूजचे स्पर्धा प्रमाणपत्र आणि विजेत्यांना आकर्षक बक्षिसे!

गट-अ : इयत्ता पहिली ते चौथी

गट-ब : इयत्ता पाचवी ते नववी

विषय : १) **निसर्ग चित्र**

२) **स्मरण चित्र**

३) **माझे शहर** (संकल्प चित्र)

दिव्यातील विद्यार्थ्यांनी व पालकांनी अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर किंवा क्रमांकावर संपर्क करा

गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंट मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-६१२.

मो. +९१ ९०२९७ ५७०९१

### स्पर्धेचे नियम

- आर्ट वर्क -A4 किंवा A3 आकारात असावे.
- चित्र कोणत्याही कोऱ्या कागदावर काढता येईल.
- चित्रासाठी कोणतेही माध्यम वापरता येईल.उदाहरणार्थ, जलरंग, ॲक्रेलिक, क्रेऑन चारकोल, रंगीत पेन्सिल, तैलरंग, स्केचपेन इत्यादी.
- चित्र प्रत्यक्ष किंवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवू शकता. पाकिटावर किंवा व्हाट्सअप मेसेज करताना चित्रकला स्पर्धेसाठी असा उल्लेख असावा.
- चित्र तुम्हाला सुचलेले आणि स्वतंत्र असावे.

उत्कृष्ट चित्रांना दिशादर्शक, मार्गदर्शक! दिवा न्यूज च्या अंकामधून प्रसिद्धी दिली जाईल.

चित्रासोबत तुमचे पूर्ण नाव, पत्ता, इयत्ता, संपर्क क्रमांक लिहावा!

चित्र पाठवण्याची अंतिम तारीख २१ डिसेंबर २०२२

परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील!

– संपादक,दिवा न्यूज



# ठामपा आयुक्तांनी साधला कंत्राटी सफाई कामगारांशी संवाद

**ठाणे: तीन हात नाका ते वागळे इस्टेट या भागाच्या पाहणी दौऱ्यात ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी कंत्राटी सफाई कामगारांशी संवाद साधला, त्यांच्या व्यथा ऐकल्यानंतर त्या सोडविण्याबाबत त्याशिवाय नाले ,शौचालय आणि रस्त्यावरील डेब्रिज याच्यासह स्वच्छता आणि साफसफाईबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आयुक्तांनी सूचना केल्या.**



पाहणी दौऱ्यांच्या सुरुवातीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष निधीतून सुरू असलेल्या धर्मवीर चौक येथील कॉंक्रीटीकरणाच्या कामाची पाहणीही आयुक्तांनी यावेळी केली. तसेच, या आधीच्या पाहणी दौऱ्यात तीन हात नाका येथील चौकात मध्यभागी असलेले सीसीटिव्हीचे खांब, वायरींचे जाळे योग्य ठिकाणी हलविण्याच्या सूचना दिल्या होत्या. ते काम पूर्ण झाले असून चौक मोकळा झाला आहे. आता त्याच्या सुशोभिकरणास सुरूवात होईल, असे आयुक्त बांगर यांनी नमूद केले. वाहतूक पोलिसांनी एका चौकीचीही मागणी यावेळी आयुक्तांकडे केली. त्यावर त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

तीन हात नाका येथे जागोजागी कचरा पडलेला होता. तो पाहून स्वच्छता काटेकोरपणे करण्याची सूचना आयुक्तांनी दिली. तसेच, भंगारात पडलेली वाहने उचलण्यासाठी वाहतूक पोलिसांना मदत करण्याच्या सूचना परिमंडळ उपायुक्त शंकर पाटोळे यांना दिल्या.

श्रीनगर भागात एका मंगल कार्यालयाजवळ पडलेली डेब्रिज तातडीने हटविण्यास आयुक्तांनी सांगितले. तसेच, वागळे इस्टेट मधील एका रस्त्याचे काम सुरू असताना त्याची डेब्रिज दुसरीकडे टाकल्याबद्दल नोटीस बजावण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. एकंदर शहरात बेशिस्तपणे डेब्रिज टाकण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर दिसते. त्याबाबत प्रभाग समिती कार्यालयांनी दक्ष रहायला हवे. दंड आकारून ही प्रवृत्ती मुळातच कमी व्हावी म्हणून प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

पलॅब कंपनीच्या चौकात काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांशी आयुक्त बांगर यांनी संवाद साधला. पगार वेळेवर मिळतो का? हातमोजे, गणवेश, मिळतात का? असे प्रश्न आयुक्तांनी त्यांना विचारले. त्यावर, पगार मागे पुढे होतो, वेळेत मिळत नाही, अशी व्यथा त्या कंत्राटी सफाई कामगारांनी मांडली. शिवाय, हातमोजे आणि गणवेशाशिवाय काम करावे लागते असेही ते म्हणाले. आयुक्त बांगर यांनी याची दखल घेतली आणि पगार, गणवेश, हातमोजे आदी वेळेत मिळण्याबद्दल ताबडतोब उपाययोजना करण्याचे निर्देश उपायुक्त (घनकचरा) यांना दिले.

किसन नगर परिसरात पाहणी करताना नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा आयुक्तांच्या निदर्शनास आला. तीच स्थिती, वागळे इस्टेट मधील लोढा सुप्रीमस शेजारील मोठ्या नाल्याची होती.

एकंदर परिस्थिती पाहता, नालेसफाई झाली की नाही असा प्रश्न उपस्थित झाला. या अस्वच्छतेची दखल घेऊन ताबडतोब नालेसफाई करण्याचे आदेश आयुक्त बांगर यांनी दिले.त्याचवेळी, पावसाळ्याशिवाय, वेळोवेळी नालेसफाई झाली पाहिजे, अशी भूमिका आयुक्त बांगर यांनी मांडली. प्रत्येक नाल्यावर दोन्ही बाजूंनी जाळी बसवावी. यासाठी लवकरच शहरभर मोहिम हाती घेतली जाणार आहे. तसेच, नाल्यावर जेथे कल्व्हर्ट असेल त्याचा बाजूला प्रवाहाच्या दिशेने स्क्रीन (जाळी) बसवली जावी. जेणेकरून पाण्यावर तरंगणारा कचरा जाळीला अडकेल आणि शहरात शिरणारा नाला, शहराबाहेर पडेपर्यंत घनकचरा मुक्त करणे शक्य होईल, अशी व्यवस्था लवकरच सर्व नाल्यांवर करण्याचे सूतोवाच आयुक्त बांगर यांनी केले.

राम नगर येथील धर्मवीर चौक येथे आयुक्त बांगर पाहणी करत असताना काही नागरिकांनी सांडपाणी वाहून नेणारी पाइपलाइन वारंवार तुंबत असल्याची तक्रार केली. आयुक्तांनी त्या भागाची पाहणी केली आणि तत्काळ या पाइपलाइनच्या दुरुस्तीचे आदेश दिले. संबंधित यंत्रणेने ते काम सुरूही केले.

तसेच, राम नगर येथील वरच्या भागात शौचालय नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिल्यावर तिथे ताबडतोब कंटेनर प्रकारचे शौचालय देण्याचे आदेश आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिले.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# ठाणे शहर वाहतूक कोंडी मुक्त करण्यासाठी सरकार कटिबध्द

**ठाणे : ठाणेकरांना अंतर्गत वाहतूक कोंडीतून दिलासा मिळावा यासाठी वेगवेगळे प्रकल्प राबवले जात आहेत. त्यात, बायपास, ईस्टर्न फ्री वेचा विस्तार यांचा समावेश आहे. एमएमआरडीए आणि ठाणे महानगरपालिका त्यासाठी काम करते आहे. त्यामुळे सगळे रस्ते वाहतूक कोंडी मुक्त होतीलच, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तिसऱ्या कळवा खाडी पुलाच्या मार्गिकेच्या लोकार्पण सोहळ्यात व्यक्त केला.**



## मुख्यमंत्र्यांनी केले तिसऱ्या कळवा खाडी पुलाच्या मार्गिकेचे लोकार्पण



कळवा खाडीवरील तिसऱ्या पुलाच्या एका मार्गिकेचे रविवारी सायंकाळी मुख्यमंतत्र्यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्यावेळी, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार जितेंद्र आव्हाड, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, मिनाक्षी शिंदे, माजी उपमहापौर पल्लवी कदम, गोपाळ लांडगे, सुधीर कोकाटे, ठामपा आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, शहर अभियंता प्रशांत सोनग्रा आदी उपस्थित होते.

आयुक्त अभिजित बांगर यांनी मान्यवरांचे स्वागत केले आणि तिसऱ्या कळवा खाडी पुलाबद्दल सादरीकरण केले. तसेच, उर्वरित कामांच्या प्रगतीची माहिती दिली.

तिसऱ्या खाडी पुलाचे लोकार्पण झाल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केले. तसेच, पुढील मार्गिका एक डिसेंबर रोजी सुरू करण्याची घोषणाही केली. तसेच, या पुलाचा विस्तार पटनीपर्यंत करण्याचा सरकारचा मानस असल्याचेही स्पष्ट केले. तीन हात नाका, माजीवडा जंक्शन येथेही लवकरच काम सुरू होईल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले.

लोकार्पण सोहळ्यानंतर सर्व मान्यवरांनी तिसऱ्या कळवा खाडी पुलावरून प्रवास केला आणि ही मार्गिका तत्काळ लोकांसाठी खुली करण्यात आली. ठाणे कारागृहाजवळील मार्गिका डिसेंबर महिन्यामध्ये वाहतूकीस खुली करण्यात तयार होईल.उर्वरित साकेत कडील मार्गिका मार्च २०२३ पर्यंत वाहतूकीस पूर्ण तयार होऊन संपूर्ण पूल वाहतूकीस उपलब्ध होईल.

संपूर्ण पूल मार्च २०२३ मध्ये वाहतूकीस उपलब्ध झाल्यानंतर कळवा, मुंब्रा आणि बेलापूर कडे जाणारी संपूर्ण वाहतूक पूलावरुन एकेरी मार्गाने जाईल आणि बेलापूर रोड कळवा, मुंब्रा कडून ठाणे शहराकडे येणारी वाहतूक पूर्णपणे सध्या वापरात असलेल्या पूलावरुन एकेरी मार्गाने धावताना दिसेल.तर, पूल पूर्ण क्षमतेने मार्च २०२३ मध्ये वाहतूकीस उपलब्ध झाल्यानंतर या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडीची संपूर्ण समस्या दूर होणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# ठाणे जिल्हा झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी सरकारने विशेष धोरण आखावे!

## भाजपचे कृष्णा पाटील यांनी विशेष मुलाखतीत मांडली भूमिका



### एसआरए आणि क्लस्टर योजनेत समानता आणल्यास लाखो ठाणेकरांना दिलासा, कृष्णा पाटील यांचा पाठपुरावा सुरू!

**नागरीकरणाच्या दृष्टीने ठाणे जिल्ह्यात आज सर्वाधिक झोपडपट्टी असलेली पाहायला मिळते. ठाणे जिल्ह्यामध्ये असलेल्या सहा महानगरपालिकांमध्ये विविध ठिकाणी झोपडपट्ट्या वाढलेला पाहायला मिळतात. धोकादायक इमारतींचा प्रश्न ठाणे जिल्ह्यात आहे. परिणामी ठाणे जिल्हा झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी धारावीच्या धर्तीवर शासनाने विशेष धोरण आखावे अशी भूमिका भाजपचे कृष्णा पाटील यांनी मांडली आहे. ठाणे जिल्ह्यासाठी विशेष धोरण राबवल्यास याचा फायदा जिल्ह्यातील लाखो झोपडपट्टी धारकांना होईल असा विश्वास त्यांनी वृत्तपत्र 'दिवा न्यूज'ला दिलेल्या मुलाखती दरम्यान व्यक्त केला...**

**प्रश्नः– तुम्ही एस आर ए योजना व क्लस्टर यांच्या समानता आणण्याची मागणी केली आहे,याबाबत काय सांगाल..**

**कृष्णा पाटीलः–**एस आर ए योजना आणि क्लस्टर या दोन्ही योजनांचा उद्देश तसं पाहिलं तर एक आहे. झोपडपट्टी कमी करणे, धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देणे,घरे देणे.. मात्र या दोन्ही योजनांच्या नियमांकडे पाहिलं तर आपल्याला फार फरक असलेला पाहायला मिळतो...दोन्ही योजना मध्ये मिळणाऱ्या घरांच्या बांधकाम क्षेत्रफळात फरक आहे, पात्रतेच्या निकषांमध्ये फरक आहे. क्लस्टर मध्ये २०१९ पर्यंतच्या नागरिकांना पात्रता आहे.तर एस आर ए मध्ये २०११ पर्यंत नागरिकांना पात्र समजलं जातं. क्लस्टर योजनेत वन प्लस घरांना पात्र समजलं जातं, तर दुसरीकडे एस आर ए मध्ये ही सुविधा मिळत नाही. एस आर ए मध्ये तळ अधिक वरच्या घरांना परवानगी न मिळाल्याने वरचे नागरिक पुन्हा दुसरीकडे झोपडपट्टी बांधू शकतात. त्यामुळे या दोन्ही योजनांमध्ये समानता आणण्यात यावी आणि लाखो झोपडीधारकांना दिलासा द्यावा अशी माझी भूमिका आहे. या भूमिका नागरिकांच्या हिताच्या असून व्यापक जनहित लक्षात घेतले तर ठाणे जिल्ह्यातील सहा महानगरपालिका मधील लाखो झोपडदारीकांना या गोष्टीचा फायदा होईल असं मला वाटतं.सरकारने याबाबत सकारात्मक विचार करावा त्यासाठी माझा हा लढा सुरू आहे!

**प्रश्नः– दोन्ही योजनांमध्ये समानता नसल्याने नेमके काय प्रश्न निर्माण होत आहेत?**

**कृष्णा पाटीलः–**लाखो झोपडीधारकांना याचा फटका बसत आहे. दोन्ही योजना समानता आणली तर काम लवकर होतील. आज जे प्रकल्प रखडले आहेत ते मार्गी लागतील.नागरिकांमध्ये सुद्धा द्विधा मनस्थिती राहणार नाही. मुळात दोन्ही योजनांचा उद्देश हा सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याचा असल्याने दोन्ही योजनांच्या अंमलबजावणीसाठी एक स्वतंत्र कक्ष नेमला तर या योजनेत समानता शक्य आहे.

**प्रश्नः– तुम्ही या मागणीसाठी शासन दरबारी पाठपुरावा करत आहात.. काय अनुभव आहे?**

**कृष्णा पाटीलः–** सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद आहे. मी मंत्री महोदय रविंद्र चव्हाण साहेब यांना या संदर्भात भेटलो आहे.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदने दिली आहेत. माझ्याकडून प्रामाणिक पाठपुरावा या संदर्भात सुरू आहे. ठाणे जिल्ह्यातील सर्वसामान्य झोपडपट्टी धारकारांना न्याय मिळावा यासाठी हा विषय शासन दरबार मी मांडत राहणार आहे. मला एकच सांगायचं आहे धारावीसारख्या भागाला जो न्याय दिला जातो, तोच न्याय ठाणे जिल्ह्यातील झोपडपट्टी भागाला दिला जावा! ठाणे जिल्ह्यातील झोपडपट्टी विकसित करण्यासाठी ठाणे जिल्हा झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी विशेष धोरण सरकारने राबवावे अशी माझी भूमिका आहे. मला खात्री आहे भारतीय जनता पार्टी आणि बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाच्या सरकारच्या माध्यमातूनच जनतेच्या हिताचे हे काम होऊ शकते. एस आर ए आणि क्लस्टर यामध्ये समानता आणण्यासाठी सरकार ने सकारात्मक पावलं लवकरात लवकर उचलावीत. जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळेल. यासाठी आवश्यकता वाटल्यास यापुढेही संबंधितांच्या भेटीगाठी मी घेणार आहे. ठाणे जिल्ह्यात आज सर्वाधिक झोपडपट्टी आहे. मजूर व गरीब वर्ग मोठ्या संख्येने ठाणे जिल्ह्यात आज वेगवेगळ्या महापालिकांमध्ये राहत आहे. जलद गतीने हा निर्णय झाल्यास नागरिकांना त्याचा फायदा होईल आणि नागरिकांचा हा फायदा करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अशी माझी मागणी आहे.



## ज्योती पाटील यांच्याकडून महिलांसाठी शिबीराचे आयोजन

**दिवाः–**दिवा भाजपच्या महिला अध्यक्षा सौ.ज्योती राजकांत पाटील यांच्या वतीने जनधन योजनेबाबत शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी दिव्यातील ८० महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला. दिव्यातील महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी ज्योती पाटील या कायम आग्रही असलेल्या दिसतात.जनधन योजनेबाबत शिबीर आयोजित केल्या बद्दल महिलांनी ज्योती पाटील यांचे आभार मानले आहेत.




## भाजपा आयोजित दशावतार नाटकाला कोकणवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दिवाः–** भारतीय जनता पार्टी दिवा शहर व सिंधुदुर्ग रहिवाशी संघ,बेडेकर नगर,दिवा आयोजित दशावतार नाटकाला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत गर्दी केली. ओम वीरभद्र दशावतार नाट्य मंडळ भांडुप यांचे पौराणिक दशावतार नाटक देव झाला डफली वाला या कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी भारतीय जनता पक्षाचे दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे,महिला मंडळ अध्यक्षा ज्योती पाटील,प्रिया ठाकूर,विनोद भगत,प्रकाश पाटील,ठाणे जिल्हा कार्यकारणी सदस्य विजय भोईर,ठाणे उपाध्यक्ष नरेश पवार,कल्पना पाटील,गणेश नेवगे,उमेश घोगळे, सरचिटणीस समीर चव्हाण,अशोक पाटील, रोशन भगत, जयदीप भोईर,श्रीधर अजय सिंग अवदराज, विरेद गुप्ता, युवराज यादव,नणेश नगर वार्ड अध्यक्ष नागेश पवार अमरनाथ गुप्ता,आदी उपस्थित होते.

# स्मार्ट सिटी योजनेच्या सर्वेक्षणात ठाणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

***ठाणे :** शहर नियोजनाचे धोरण ठरविताना त्यात ठाणेकर नागरिकांचा सहभाग कसा वाढविता येईल, यासाठी एक मार्गदर्शक प्रणाली तयार करण्याचे काम केंद्र सरकार स्मार्ट सिटी योजनेतंर्गत करीत आहे. यासाठी देशातील सर्व १०० स्मार्टसिटी शहरांमध्ये 'अर्बन आउटकम फ्रेमवर्क २०२२' या कार्यक्रमातंर्गत गुरुवारी ९ नोव्हेंबर २०२२ पासून 'नागरिक आकलन सर्वेक्षण' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे यासाठी सर्व प्रभागसमिती स्तरावरुन जाहिरात, पथनाट्य आदीच्या माध्यमातून जनजागृती करण्याच्या सूचना ठाणे स्मार्टसिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी सहाय्यक आयुक्तांना दिल्या.*



नागरिक आकलन सर्वेक्षण २०२२ या उपक्रमात नागरिकांना सहभागी करुन घेता यावे, यासाठी गुरुवारी ठाणे स्मार्ट सिटी लि चे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवी यांनी महापालिकेच्या सर्व प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांची बैठक घेतली.

नागरिकांना या अर्बन आऊटफ्रेमवर्क या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी करुन घेण्यात यावे, तसेच या उपक्रमाची माहिती नागरिकांपर्यंत पोहचावी यासाठी जनजागृती व्हावी या दृष्टीकोनातून प्रभागसमितीनिहाय सार्वजनिक ठिकाणी बॅनर्स लावणे, वेगवेगळ्या विभागात पथनाट्य सादर करणे, स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थांचा सहभाग घेणे, तसेच सदर उपक्रम जास्तीत जास्त नागरिकांपर्यत पोहचावा यासाठी वर्दळीच्या ठिकाणी उदा. मॉल्स, रेल्वेस्थानक परिसर, एस.टी. स्टॅण्ड, रिक्षा स्टॅण्ड आदी ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

केंद्र शासनाच्या ग्रुहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयच्या सुचनांनुसार स्मार्ट सिटी मिशनच्या अंतर्गत समाविष्ट देशातील सर्व १०० स्मार्ट सिटी शहरांमध्ये अर्बन आउटकम फ्रेमवर्क २०२२ हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शहरातील महानगरपालिका, राज्य शासन केंद्र शासनाचे विविध कार्यालयांशी संबंधित एकुण ३७२ प्रकारचे मुद्द्यांवर आधारित माहिती केंद्र सरकारच्या एंपलीफाय पोर्टल वर अपलोड करण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार महापालिका आयुक्त अभिजीत बांगर आणि ठाणे स्मार्ट सिटी लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी यांच्या मार्गदर्शनाखाली स्मार्ट सिटी लि कक्षाने यांनी शासनाचे दिलेल्या मुदतीत काम १००% पूर्ण केले आहे.

> ***नागरिकांनी आपल्या शहरासाठी या सर्वेक्षणात सहभागी होवून मत नोंदविणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण देशात ठाणे शहराचे मानांकन वाढण्यात मदत होईल. मत नोंदविण्यास फारसा वेळ लागत नाही. तरी ठाणेकरांनी या सर्वे क्षणात सहभागी व्हावे.***
>
> ***– अभिजीत बांगर,***
> ***आयुक्त, ठामपा***

याच कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात केंद्र शासन शहरातील नागरिकांना सुध्दा समाविष्ट करून त्यांच्या प्रतिक्रिया ऑनलाईन पध्दतीने देता येतील. याबाबत शहरात विविध ठिकाणी विविध उपक्रम राबवून या कार्यक्रमाची प्रचार प्रसिद्धी करण्यासाठी स्मार्ट सिटी कक्षास केंद्र शासनाने आदेशित केले आहे.

नागरिकांना आपली मते https://eo/2022.org/ या बेवसाईटवर नोंदविता येतील यासाठी ठाणे शहरासाठी ८०२७८७ हा कोड वापरावा असे आवाहन ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेडच्यावतीने करण्यात आले आहे.




## ठामपा माजी नगरसेविका रागिणी बैरीशेट्टी असंख्य कार्यकर्त्यांसोबत शिवबंधनात

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा ठाण्यात धक्का



**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका रागिणी भास्कर बैरीशेट्टी यांनी शुक्रवारी मातोश्री येथे शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासमवेत भास्कर बैरीशेट्टी व शिवाई नगर, पवार नगर, येऊर, वसंत विहार येथील मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी प्रवेश घेतला. त्यांचे ठाकरे यांनी स्वागत केले. ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा धक्का बसला आहे

प्रवेशावेळी खासदार शिवसेना सचिव विनायक राऊत, खासदार राजन विचारे, शिवसेना उपनेत्या अनिता बिर्जे, शिवसेना ठाणे लोकसभा संपर्क प्रमुख मधुकर देशमुख, ओवळा माजीवडा विधानसभा संपर्क प्रमुख नरेश मणेरा, रेखा खोपकर, संजय घाडीगावकर व ओवळा माजीवडा विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## वॉशिंग मशीनला आग; एक जण जखमी

**ठाणे:** कळवा येथील मनीषा नगर १ येथील प्रतीक्षा अप्पार्टमेंट, बी विंग, ४ था मजला,रूम नंबर ४३ हा नितीन गायकवाड यांच्या मालकीचा असून त्यांच्या घरातील वॉशिंग मशीनला आणि इलेक्ट्रॉनिक स्वीचला गुरुवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास किरकोळ आग लागली. यावेळी,घरातील इलेक्ट्रॉनिक स्वीच बंद करत असताना प्रतीक नितीन गायकवाड यांच्या डाव्या पायाला किरकोळ दुखापत झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी धाव घेत, लागलेली आग टोरंटचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने पूर्णपणे नियंत्रणात आणली. तसेच जखमीला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## अस्वच्छतेबद्दल दोन जणांवर दंडात्मक कारवाई

**ठाणे :** सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, जन्म दाखल्यासाठी पैसे मागणे या सारख्या ठामपा कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळे शहराची प्रतिमा मलिन होते. त्यामुळे आयुक्त अभिजीत बांगर यांनी त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली होती. बुधवारी झालेल्या दौऱ्यातही आयुक्तांनी आणखी दोन नागरिकांवर कारवाई केली.

पलॅब कंपनीच्या चौकात पाहणी सुरू असताना एक रिक्षाचालक व्यक्ती, चित्रांनी सुशोभित केलेल्या भिंतींवर लघुशंका करताना आढळली. त्यांना जागेवरच दंड करण्याचे निर्देश आयुक्तांनी उपायुक्त शंकर पाटोळे यांना दिले. तिथे असलेल्या स्वच्छता निरीक्षकाने दंडाची कारवाई केली. पाठोपाठ, वागळे इस्टेट येथे नाल्याची पाहणी सुरू असतानाच तिथेच रस्त्याच्या बाजूला लघू शंका करणाऱ्या दुसऱ्या नागरिकालाही दंड करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. त्याचप्रमाणे, स्वच्छता निरीक्षकाने कारवाई केली.

शहर सुशोभिकरण, स्वच्छता मोहीम यातून शहरातील स्वच्छतेचे भान वाढविण्याचा पालिका आटोकाट प्रयत्न करत आहे. त्या प्रयत्नांना अशा बेशिस्त वर्तनामुळे तडा जातो. त्यामुळे कारवाईची अप्रिय भूमिका घ्यावी लागते, असे या घटनांबद्दल आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले. तसेच, नागरिकांनी रस्त्यावर कचरा टाकताना, लघू शंका करताना, थुंकताना आपल्या शहराचा विचार करावा आणि अशा बेशिस्त वर्तनापासून दूर रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# मतदारांनी नाव मतदार यादीत समाविष्ट करावे
## - जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यातल मतदारयादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम सुरु झाला असून या मतदार नोंदणी मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींसह दिव्यांग, तृतीयपंथी, बेघरांनी आपले नाव मतदारयादीमध्ये समाविष्ट होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांनी केले आहे.

पात्र मतदारांनी मतदारयादीत आपले नाव नोंदविण्यासाठी व्होटर हेल्पलाईन प (तक-), एनएसव्हीपी व व्होटर पोर्टल या ऑनलाईन सुविधांचा वापर करावा. तसेच प्रत्येक मतदाराने प्रारुप मतदारयादीतील आपला तपशिल अचूक आहे का याची खात्री करावी, असे आवाहनही शिनगारे व जिंदल यांनी केले आहे.

## मतदार नोंदणीसाठी विशेष मोहीम
## विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम

१ जानेवारी २०२३ या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली असून या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. यावेळी जिल्हाधिकारी शिनगारे यांनी सविस्तर माहिती दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना कदम, तहसीलदार सोनवणे आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणीसाठी शनिवार, १९ व रविवार, २० नोव्हेंबर २०२२ आणि शनिवार, ३ व रविवार, ४ डिसेंबर २०२२ रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी मतदारसंघातील मतदान केंद्रावर बीएलओ उपस्थित राहणार आहेत. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये शहरी व निम शहरी भाग मोठ्या प्रमाणावर असल्याने गृहनिर्माण सहकारी संस्थांचे सेक्रेटरी यांना मतदान केंद्र स्तरीय स्वयंसेवक (ह्रैंह ङ्र्शींश्र तेर्ल्लिपींशिश) घोषित केलेले आहेत. मतदार नोंदणी वाढविण्यासाठी मोठ्या सोसाट्यांच्या ठिकाणीही विशेष नोंदणी शिबिरासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन शिनगारे यांनी केले आहे.

संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम काळात युवावर्ग, दिव्यांग महिला, देह व्यवसाय करणाऱ्या महिला, बेघर, भटक्या व विमुक्त जमातीच्या व्यक्ती, तृतीयपंथी या घटकांची नोंदणी वाढवी, यासाठी विशेष लक्ष देण्यात येणार आहे. आदिवासी महिलांच्या नोंदणीसाठीही मुरबाड, भिवंडी ग्रामीण, शहापूर येथे विशेष शिबिर घेण्यात येणार आहे. या विशेष मोहिमेत वय वर्षे १८-१९ वयोगटातील मतदार, तृतीयपंथी, देह व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आणि दिव्यांग मतदारांनी सहभागी होऊन आपले नाव मतदारयादीत समाविष्ट करून घ्यावे. याकरिता मतदारांनी आपल्या जवळच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे जाऊन मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना ६ चे अर्ज भरुन द्यावे किंवा एनएसव्हीपी, व्हीएचए व व्हीपोर्टल या पोर्टलवर लॉग-इन करुन आपले नाव समाविष्ट करण्याबाबत ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन कदम यांनी केले आहे.

मतदार यादीमधील नोंदणीमध्ये दुरुस्ती, नाव वगळणी, नविन नोंदणी तसेच मतदार यादतील नोंदणीस आधार क्रमांक जोडणी इत्यादी प्रक्रिया गावातील नागरिकांपर्यंत सुलभतेने पोहचाव्यात, याकरिता गुरुवार, १० नोव्हेंबर २०२२ रोजी ठाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसेभेचे आयोजन करण्यात येणार आहे. या विशेष ग्रामसभेत प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप मतदारयादीचे वाचन होणार आहे. त्यानुसार मतदारयादीत नाव समाविष्ट असलेल्या मतदारांच्या नावामध्ये दुरुस्ती, रहिवाशांचे स्थलांतरण विधानसभा अंतर्गत/बाहेरील, मतदार ओळखपत्र बदलून देणे, दिव्यांग म्हणून चिन्हांकीत करावयाचे असल्यास नमुना ८ तसेच आपले मतदार ओळखपत्राशी आधारकार्ड जोडणी करण्याकरिता नमुना ६-ब भरुन संबंधीत मतदार आपल्या जवळच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी किंवा एनएसव्हीपी, व्हीएचए व व्हीपोर्टल या पोर्टलवर लॉग-इन करुन संबंधीत अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करुन विशेष ग्रामसभेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी शिनगारे यांनी केले आहे.

ग्रामीण भागात मतदार नोंदणी वाढावी, यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची संख्या वाढविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांनी दिली.

# एमपीएससी मुख्यालय मंजूरीबाबत आमदार निरंजन डावखरेंचे आभार

**ठाणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) मुख्यालयाच्या बेलापूर येथील स्वतंत्र इमारतीला जागा मिळविण्याबरोबरच राज्य सरकारकडून २८२ कोटी रुपयांच्या मंजुरीसाठी प्रयत्न केल्याबद्दल स्टूडंट्स राईट्स असोसिएशनने कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजप आमदार निरंजन डावखरे यांचे आभार मानले.

## स्टूडंट्स राईट्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांकडून भेट

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध पदांसाठी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांमध्ये लाखो विद्यार्थी सहभागी होतात. मात्र, वर्षानुवर्षे लोकसेवा आयोगाच्या मुख्यालयासाठी स्वतंत्र जागा नव्हती. विक्रीकर विभागाच्या माझगाव येथील तीन मजल्यांवरून, तर फोर्ट येथील एका इमारतीच्या एका मजल्यावरून आयोगाचा कारभार सुरू होता. भाडेपट्ट्यावरील इमारतीतून सुरू असलेल्या या कारभारामुळे विस्कळितपणा होता. त्याचा लाखो विद्यार्थ्यांना फटका बसत होता. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्वतंत्र इमारत होण्याची गरज होती. या प्रश्नावर स्टूडंट्स राईट्स असोसिएशनचे पदाधिकारी महेश बडे व किरण निंभोरे यांनी आमदार निरंजन डावखरे यांच्याकडे २०१८ मध्ये संपर्क साधला होता. त्यावेळी कोकण भवन येथील मुख्यालयाशेजारील मोकळ्या भूखंडावर लोकसेवा आयोगाचे मुख्यालय उभारता येणार असल्याची सुचवून शासकीय यंत्रणांकडे पाठपुरावा सुरू केला होता. विधान परिषदेतील २०१८ मधील अधिवेशनात आमदार डावखरे यांनी एमपीएससीच्या मुख्यालयाचा प्रश्न मांडला होता. त्यानंतर राज्य सरकारकडून कार्यवाही सुरू करण्यात आली. मात्र, काही तांत्रिक बाबी व परिपूर्ण मुख्यालयासाठी वाढीव खर्चाची तरतूद अपेक्षित होती. त्यामुळे मुख्यालयाला सुधारित मान्यता मिळाली नव्हती. अखेर राज्य सरकारने नुकताच मुख्यालयासाठी २८२ कोटी २५ लाख रुपये खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाबद्दल आमदार डावखरे यांचे असोसिएशनच्या वतीने आभार मानण्यात आले. त्याचबरोबर लिपिक वर्गाच्या परीक्षा लोकसेवा आयोगामार्फत घेण्याच्या मागणीबाबत यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार डावखरे यांचे आभार मानून, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले.



### स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणार
### -निरंजन डावखरे

**स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यात येतील. त्याचबरोबर आगामी काळात होणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षांमध्ये पदांची संख्या वाढविण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन आमदार डावखरे यांनी स्टूडंट्स राईट्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना दिले.**

# ठामपातील कंत्राटी कामगाराचे धरणे आंदोलन

**ठाणे :** ठाणे महापालिकेतील फायलेरिया विभागात २०१६ पासून कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांनी शुक्रवारी खारटन रोड येथील फायलेरिया विभागाच्या कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन केले.

या आंदोलनात ठाणे जिल्हा इंटक कॉग्रेस अध्यक्ष सचिन शिंदे तसेच प्रभाग कॉग्रेस अध्यक्ष प्रविण खैरालिया यांनी सहभाग घेऊन आपला पाठींबा जाहीर केला.या प्रसंगी बोलताना या कामगारांचे नेतृत्व करणारे कर्मचारी मुकेश लाहोट यांनी सांगितले की,आम्ही २०१६ पासून ठाणे महापालिकेतील फायलेरिया विभागात कंत्राटी पद्धतीवर काम करित असून आम्ही कोरोना सारख्या महामारीत आपल्या जीवाची पर्वा न करता कोणत्याही साधन सुविधा नसतानाही आम्ही दिवस रात्र सेवा दिली.आमचे काही सहकार्यानाही कोरोना सारख्या आजाराला सामोरे जावे लागले होते, कोकणातील आपत्ती मध्येही महानगरपालिकेच्या वतीने आम्ही कोकणवासीयाना मदत करण्याचे काम केले असून आम्ही कोणतीही अपेक्षा ठेवली नव्हती परंतु मागच्या नोव्हेंबर पासून आमचा पगार थकवित ३० एप्रिल पासून ब्रेक दिला आहे कोरोना कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीवर कामावर घेतलेल्या कर्मचाऱ्यांना आता फायलेरिया विभागात कोणताही अनुभव नसताना कामावर घेतले परंतु आम्हाला एप्रिल पासून ते आजतागायत बोलविण्यात येत नाहीये याबाबत आम्ही मुख्यमंत्री,माजी महापौर,आयुक्त यांनाही वारवार निवेदन देत असतानाही आमचा विचार होत नसल्याचे सांगितले.



या प्रसंगी बोलताना सचिन शिंदे यांनी सांगितले की,राज्यातील सत्ताबदल झाल्यावर ठाण्यातील मुख्यमंत्री होतो ही निश्चितच ठाणेकरांसाठी आनंदाची बातमी असताना मात्र याच ठाण्यातील कंत्राटी कामगारांवर अशा प्रकारची वागणूक मिळत असेल तर या कामगारांनी न्याय तरी कुठे मागायचा?असा सवाल करित मुख्यमंत्री यांनी याबाबत त्वरित दखल घेऊन या कामगारांवरील अन्याय दूर करावा,अशी मागणी केली.

या प्रसंगी मोठ्या प्रमाणात फायलेरिया विभागात कंत्राटी पद्धतीवर काम केले कामगार उपस्थित होते.

# जयगडमधील समस्या सोडवण्यासाठी कंपन्यांनी पुढाकार घ्यावा –जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश




**जाकादेवी :** रत्नागिरी तालुक्यातील जयगड परिसरात तीन मोठे उद्योगसमूह असून त्यांनीच पंचक्रोशीतील समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंह यांनी केले आहे.पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी, प्रांत डॉ. विकास सुर्यवंशी, तहसीलदार शशिकांत जाधव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. अनिरूद्ध साळवी कमलेश बापट, प्रसाद गुरव, सरपंच फरजाना डांगे यांनी समस्यांबाबतचा तपशील जिल्हाधिकाऱ्यांना सांगितला.

पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी गेल्या आठवड्यात जयगड पंचक्रोशीचा दौरा केला होता. या दौऱ्यात ग्रामस्थांनी आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या मांडल्या होत्या. जे. एस. डब्ल्यू पोर्ट, एनर्जी, चौगुले पोर्ट या कंपन्यांनी स्थानिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केल्या. सडेवाडीत गणेश विसर्जन घाटात ये-जा करण्यासाठी कायमस्वरूपी पक्का रस्ता बांधून मिळावा, श्रीदेव कऱ्हाटेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरूस्ती, खोल विहिरीला कुंपण घालून डागडुजी करणे, कंपनीतील कामगारांना पगारवाढ, जयगड पंचक्रोशीतील गावांसाठी ११ ट्रान्सफार्मरसह आवश्यक सुविधा मिळाव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती.

तीन एकर मोकळ्या जागेवर खोदण्यासाठी कंपन्यांनी सहकार्य करावे, जयगड-निवळी रस्त्याची दुरूस्ती, अवजड वाहतूक बंद करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. पाच ग्रामपंचायतींचे घरबांधणीला परवानगी देण्याचे अधिकार बंदर विभागाकडे देण्यात आले असून ते पुन्हा ग्रा.पं.ना द्यावे अशी मागणी करण्यात आली. जयगड खाडीतील कोळसा आयात बंद करण्याची मागणी करण्यात आली. साखर बौद्धवाडी स्मशानभूमीचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी करण्यात आली. कुणबीवाडी रस्त्यालगत कोळशाची भुकटी उडून होणाऱ्या त्रासावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली.

## दापोलीत घराला आग लागून लाखाचे नुकसान

**दापोली / प्रतिनिधी :** तालुक्यातील जालगाव ब्राह्मणवाडी येथील नितीन जाधव यांच्या घराला आग लागून १ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना बुधवारी ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. जाधव हे कामानिमित्त बाहेर गेले होते. या दरम्यान घराला आग लागली. या आगीत वॉशिंग मशिन, टीव्ही, महत्वाची कागदपत्रे, गृहोपयोगी वस्तू, कपडे असे सुमारे १ लाख रुपयांचे साहित्य आगीत जळून खाक झाले. आगीचे कारण मात्र समजू शकले नाही..

## रत्नागिरी जिल्ह्यातील महिलांच्या औषधांसाठी दोन कोटींचा निधी

राज्यातील माता सुरक्षित तर घर सुरक्षित या विशेष मोहिमेत महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता, औषधांसाठी प्रतिजिल्हा दोन कोटी रुपये निधी देण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यासाठीही दोन कोटींचा निधी उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात नवरात्री उत्सवापासून माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानास सुरूवात झाली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरूद्ध आठल्ये, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले यांच्या मार्गदर्शनात आरोग्य विभाग हे अभियान राबविले जात आहे. या अभियानास जिल्हाभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेत राज्यातील अंदाजे ४ कोटी महिलांची आरोग्य तपासणी, औषधोपचार करण्यात येणार आहे. यामध्ये १८ वर्षांवरील महिला, माता, गरोदर स्त्रिया यांचा समावेश आहे. हा कार्यक्रम दि. १५ नोव्हेंबरपर्यंत सुरू असणार आहे.

## खेड येथे दिव्यांग खेळाडूंसाठी क्रिडा मार्गदर्शन व सराव शिबिराचे आयोजन

***रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व खेळाडूंन साठी क्रिडा, शैक्षणिक,सांस्कृतिक, सामाजिक कार्य करणारे व दिव्यांग खेळाडूंना विविध दिव्यांग क्रिडा स्पर्धांन मध्ये खेळाची संधी उपलब्ध करून देणारे दिव्यांग युवा क्रिडा प्रतिष्ठान रत्नागिरी व दिव्यांग क्रिकेट असोसिएशन रत्नागिरी यांचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय खेळाडू श्री.प्रशांत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग युवा क्रिडा प्रतिष्ठान रत्नागिरी व दिव्यांग क्रिकेट असोसिएशन रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी होणाऱ्या राज्य राष्ट्रीय दिव्यांग क्रिडा स्पर्धांच्या दृष्टीने दिनांक २० नोव्हेंबर २०२२ रोजी खेड येथे लेदर बॉल क्रिकेट सराव व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील ज्या दिव्यांग खेळाडूंना या सराव शिबिरात सहभाग घ्यायचा आहे त्यांनी अपंग प्रमाणपत्र,युनिक आयडी कार्ड,आधार कार्ड,बोनाफाईड सर्टफिकेट यांची प्रत्येकी दोन झेरॉक्स,दोन पासपोर्ट साईज फोटो घेऊन सकाळी ठीक आठ वाजता खेड येथिल क्रिडा संकुल येथे उपस्थित रहाणे. उपस्थितीत राहणाऱ्या खेळाडूंन मधुन रत्नागिरी जिल्हा संघाची निवड करण्यात येणार आहे.या संदर्भात अधिक माहिती साठी प्रशांत सावंत संपर्क क्रमांक,८३०८०३७५००ओंकार साळवी संपर्क क्रमांक,९८२२३६०५२३ या नंबर वर संपर्क करावा असे दिव्यांग युवा क्रिडा प्रतिष्ठान रत्नागिरी या संस्थेच्या सचिव रेणुका गोरीवले यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.*

## परशुराम घाट वाहतुकीसाठी बंद करण्यास ग्रामस्थांचा तीव्र विरोध

मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाट चौपदरीकरणाच्या कामासाठी घाटातील वाहतूक पुन्हा बंद करण्याचा विचार सुरु आहे. प्रशासन लवकरच याबाबत निर्णय घेईल, अशी शक्यता आहे. परंतु परशुराम घाटातील वाहतूक पुन्हा बंद करण्याला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. घाट पुन्हा बंद झाल्यास विद्यार्थी, शेतकरी, नोकरदारांनी काय करायचं, असा सवालही विचारला जात आहे.

पावसाळ्यात परशुराम घाट बंद करण्यात आल्याने मोठ्या समस्यांना समोरं जावं लागलं होतं. माथ्यावर असलेल्या नागरिकांचा दैनंदिन व्यवहारही चिपळूणच्या बाजारपेठेशी असल्याने सहाजिकच घाट बंद कालावधीत त्यांना घरातच अडकून पडावं लागत होतं. त्यामुळे यावेळी मात्र घाट बंद करण्यास परशुराम ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. परशुराम घाटातील चौपदरीकरणासाठी गेले वर्षभर काम सुरु आहे. यापूर्वी घाटात डोंगर कापताना अपघात घडल्याने घाटातील वाहतूक महिनाभर बंद ठेवून काम करण्यात आलं होतं. चौपदरीकरणाच्या कामाच्या दृष्टीने २५ एप्रिल २०२२ ते २५ मे २०२२ या कालावधीत हा घाट महामार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक पूर्णत: बंद करण्यात आली होती. त्यानंतर पावसाळ्यात पोखरलेले डोंगर खचल्याने अतिवृष्टीत घाट महिनाभर बंद ठेवावा लागला होता. त्यामुळे अवजड वाहतूक बंद ठेवून ती कळंबस्ते, आंबडस, चिरणीमार्गे लोटेकडे वळवण्यात आली होती. आता घाटातील डोंगर कटाई आणि चौपदरीकरणासाठी भरावाचं काम पुन्हा सुरु केलं जाणार आहे. त्यासाठी पुन्हा महामार्ग बंद करण्यात येणार आहे. याला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

## ऑक्टोबरच्या पावसाने जिल्हयात ६०.९७ हेक्टर भातपिकाचे नुकसान

**रत्नागिरी:-** ऑक्टोबर महिन्यात पहिल्या आणि दुसऱ्या आठवडयात पडलेल्या परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे उभे पीक पावसात वाहून गेले होते. तसेच पेंडयाचेही नुकसान झाले होते. रत्नागिरी, मंडणगड व संगमेश्वर वगळता उरलेल्या ६ तालुक्यांमध्ये भातपिकाचे नुकसान झाले होते. दापोली तालुक्यात १२.१६ हेक्टर, खेड तालुक्यात १४.४९ हेक्टर, गुहागर तालुक्यात ४.५० हेक्टर, लांजा तालुक्यात ०.९३ टक्के हेक्टर, राजापूरम मध्ये ५.४५ हेक्टर व चिपळूण तालुक्यात २३.२७ हेक्टर इतक्या क्षेत्राचे परतीच्या पावसाने नुकसान केले होते. जिल्हयात एकूण ६०.९७ टक्के भातपीकाचे नुकसान झाल्याची कृषी कार्यालयात नोंद करण्यात आली आहे

## रत्नागिरी जिल्ह्यात ३०२ गावामध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे उभारणार शेतकऱ्याना होणार लाभ

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्हयात ३०२ गावांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कृषी आयुक्तांनी आदेशित केले असून हवामान विभागाच्या निकषानुसार ग्रामपंचायतीकडून जागांचा शोध सुरु आहे. मात्र जागा उपलब्ध करुन देणाऱ्या ग्रामपंचायतींची निवड करुन हे केंद्र उभारण्यात येणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यासाठी पहिल्या टप्प्यात हवामान केंद्र उभारणीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. जी ग्रामपंचायत जागा उपलब्ध करुन देईल तेथे केंद्र उभारले जाणार आहे.

### शेतकऱ्यांना होणार लाभ

स्वयंचलित हवामान केंद्र उभारल्यास पर्जन्यमान, तापमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याची दिशा व वेग आदी प्राप्त होणाऱ्या माहितीचा वापर पीकविमा योजना, हवामान आधारित फळपीक विमा योजना, कृषी हवामान सल्ला व मार्गदर्शन, कृषी संशोधन कार्य, आपत्ती व्यवस्थापन आदी उपक्रमासाठी होणार आहे.

# शिंदे रूग्णालयात रुग्ण सुविधा वाढविण्यासाठी ठामपा सकारात्मक

## आयुक्त बांगर यांनी केली पाहणी

**ठाणे :** किसननगर, श्रीनगर भागातील नागरिकांसाठी वरदान ठरलेल्या मातोश्री गंगूबाई संभाजी शिंदे रूग्णालयात रुग्ण सुविधांचा आणखी विस्तार करण्याबाबत ठाणे महापालिका सकारात्मक असल्याची ग्वाही शुक्रवारी ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली. किसन नगर - वागळे इस्टेट पाहणी दौऱ्यात, आयुक्त बांगर यांनी मातोश्री गंगूबाई संभाजी शिंदे रूग्णालयालाही भेट दिली. पाचही मजल्यावरील कामकाज, व्यवस्था आयुक्तांनी समजून घेतली.

याचदरम्यान तळमजल्यावरील ओपीडीमध्ये स्वाभाविकपणे सर्वाधिक गर्दी होती. तेथे रुग्णांच्या नातेवाईकांशी आयुक्तांनी संवाद साधला. तसेच, शौचालयांची पाहणी केली. ओपीडी मधील गर्दी लक्षात घेता ही शौचालये वेळोवेळी स्वच्छ झाली पाहिजेत,अशा सूचना आयुक्तांनी रुग्णालय व्यवस्थापकांना दिल्या.

रुग्णालयांच्या पायऱ्यांवर काही रुग्ण तसेच त्यांचे नातेवाईक नंबर येण्याची वाट पाहत बसले होते. त्यांच्यासाठी रुग्णालयांच्या हालचालींवर कोणतीही अडचण येणार नाही, अशा पद्धतीने जिन्याच्या कोपऱ्यात बसण्यासाठी खुर्च्यांची व्यवस्था करण्यास आयुक्त बांगर यांनी सांगितले.

एकंदर स्वच्छतेबद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त केले. त्याचवेळी, रुग्ण संपर्कासाठी दिलेली कॉल सेंटरचा एक नंबर बंद असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. दुसरा नंबर वापरात असल्याचे व्यवस्थापनाने सांगताच तो फोन नंबर सगळीकडे दिसेल असा लावण्याची सूचना आयुक्त बांगर यांनी केली.

रुग्णांना दिल्या जाणाऱ्या जेवणाची पाहणी करताना आयुक्तांनी काही सूचना केल्या. जेवण गरम असावे, चांगल्या दर्जाचे असावे, हातमोजे घालूनच वाढले जावे, जेवण देताना नीट काळजी घेतली जावी, असे आयुक्त म्हणाले.

या रुग्णालयाची अग्निसूरक्षा चाचणी करण्याचे निर्देश आयुक्त बांगर यांनी अग्नीशमन अधिकाऱ्यांना दिले. तसेच, रूग्णालयासमोरील गटारची तुटलेली झाकणे ताबडतोब बदलण्यास उपायुक्त शंकर पाटोळे यांना सांगितले.

या रुग्णालयांनजिक असलेल्या पालिकेच्या मीनाताई ठाकरे प्रसूतीगृहात सीझेरीयन शस्त्रक्रियेची व्यवस्था लवकरात लवकर उपलब्ध करावी, असे निर्देश आरोग्य विभागास दिले.



*"या रुग्णालयाच्या माध्यमातून उत्तम दर्जाची रुग्ण सेवा ठामपाने उपलब्ध केली आहे. नागरिकांचा प्रतिसादही चांगला आहे. या रुग्णालयाचे सक्षमीकरण व्हावे, महापालिका आवश्यक त्या सगळ्या उपाययोजना करण्यात येतील.*

*- अभिजीत बांगर, आयुक्त, ठामपा*

# रायलादेवी तलावाचे काम सुरू न करणाऱ्या कंत्राटदाराला ठामपाची नोटीस



## आयुक्त अभिजीत बांगर यांनी केला पाहणी दौरा

**ठाणे :** रायलादेवी तलावाच्या सुशोभिकरणाचे पहिल्या टप्प्यातील काम ठाणे महानगरपालिका करणार आहे. त्याचा कार्यादेश दिला असला तरी कंत्राटदाराने काम तर सुरू केलेले नाहीच, शिवाय आयुक्त अभिजीत बांगर यांच्या पाहणी दौऱ्या दरम्यान तलावा जवळ एकही कामगार हजर नव्हता. त्यामुळे हे काम का सुरू झाले नाही, याचा खुलासा करण्याची नोटीस कंत्राटदाराला बजावण्यात आली आहे.

रायलादेवी तलावाच्या सुशोभिकरणाचे काम तीन टप्प्यात केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात ठाणे महापालिका, दुसऱ्या टप्प्यात एमएमआरडीए आणि तिसऱ्या टप्प्यात केंद्र सरकारच्या अमृत योजनेत काम होणार आहे. पहिल्या दोन्ही टप्प्यांची कामे सुरू होणे अपेक्षित होते. ती कामे सुरू न झाल्याने आयुक्त बांगर यांनी पालिकेच्या कंत्राटदारांस नोटीस बजावण्याचे आदेश दिले. या कामासाठी कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही. तसेच, सगळी कामे विहित मुदतीत पूर्ण व्हायला हवी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. त्याचवेळी, एमएमआरडीएसोबत पाठपुरावा करण्याचेही निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# दर्जेदार लेगब्रेक गोलंदाज घडवण्याचा फ्रेंडशिपचा संकल्प

## हीरक महोत्सवी मित्रमेळाव्यात तयार केला नियोजनबद्ध आराखडा




**ठाणे :** जलद गोलंदाजीप्रमाणे फिरकी विशेषतः लेगब्रेक गोलंदाज हे फ्रेंडशिप क्रिकेट क्लबचा हुकमी एक्का असायचा. या अनुभवाचा फायदा युवा क्रिकेटपटूंना देऊन दर्जेदार लेगब्रेक घडवण्याचा संकल्प फ्रेंडशिप क्रिकेट क्लबच्या हीरक महोत्सवी मित्र मेळाव्यात करण्यात आला.

क्लबचे सचिव प्रल्हाद नाखवा म्हणाले, अष्टपैलू क्रिकेटपटू हे संघाचे बलस्थान असायचे. त्यात लेगब्रेक गोलंदाज संघासाठी अनेकदा तारणहार ठरले. त्यामुळे हीरक महोत्सवी मेळाव्याची तयारी करताना लेगब्रेक गोलंदाजासाठी विशेष शिबीर आयोजित करण्याचा निर्णय झाला. करोनानंतर आता क्लबचे हीरक महोत्सवी वर्ष साजरे करताना क्लबचे संस्थापक क्रिकेटपटू मोहन नाखवा (भारती), कमलाकर कोळी ( प्रगती) , जगदीश कोळी ( रेखा ) आणि सुरेश ठाणेकर ( सस्मिता) या वैवाहिक जीवनाचे अर्धशतक पूर्ण करणाऱ्या दाम्पत्याचा विशेष गौरव करण्यात आला. याशिवाय क्लबच्या या साठ वर्षातील संस्मरणीय क्षणांच्या कृष्णधवल, रंगीत छायाचित्रांचा समावेश असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन क्लबचे ८८ वर्षीय जेष्ठ क्रिकेटपटू मदन नाखवा यांच्या हस्ते करण्यात आले. या हीरक महोत्सवी मित्र मेळाव्यासाठी ठाणे महापालिकेचे माजी उपमहापौर शरद कोळी, मुंबई क्रिकेट संघटनेचे माजी उपाध्यक्ष विनोद देशपांडे, मैदानकमिटीचे उल्हास बाबरेकर, माजी नगरसेवक गिरीश राजे, स्पोर्टिंग क्लब कमिटीचे किशोर ओवळेकर, सुशिल म्हापुसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

चेंदणी कोळीवाड्यातील कुंभारवाडा (कोनबाळा ) मैदानावर टेनिसबॉल क्रिकेटप्रेमी युवकांनी एकत्र येत १९६० साली फ्रेंडशिप क्रिकेट क्लबची स्थापना केली. ठाण्यात आणि ठाणे जिल्ह्याच्या बाहेर होणाऱ्या अनेक क्रिकेट स्पर्धातून क्लबने स्पृहणीय यश संपादन केले. १९७२ साली सिझन बॉल क्रिकेटला सुरुवात केल्यावर १९७६ साली कुर्ला स्पोर्ट्स क्लब आयोजित २२ व्या बाळकृष्ण बापट ढाल उपनगरीय क्रिकेट स्पर्धेत क्लबने उपविजेतेपद मिळवले होते. त्याशिवाय ठाण्यात सपोर्टींग क्लब कमिटीतर्फे खेळवण्यात येणाऱ्या शामराव ठोसर ढाल क्रिकेट स्पर्धा, श्रीधर देशपांडे स्मृती वासंतिक क्रिकेट स्पर्धे त क्लबने आपली चांगली छाप पडली होती. पण नंतरच्या काळात कोनबाळा मैदानावर ठाणे महापालीकेच्या हरिचंद्र राऊत शाळा क्रमांक ९ आणि क्रमांक २७ ची उभारणी झाल्यावर क्रिकेट बंद पडले. त्यानंतर अकरा वर्षापूर्वी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिन साजरा करण्याचा उपक्रम क्लबने सुरु केला.

सर्वसामान्यांच्या मैदानावर खाजगी शाळेचा 'खेळ'

# न्यू होरायझन स्कॉलर्स स्कूलने आरक्षित भूखंड ढापला

## मैदान खुले न केल्यास मनसेकडून आंदोलनाचा इशारा

**ठाणे :** सर्वसामान्य ठाणेकरांसाठी आरक्षित असलेल्या मैदानाचा भूखंड घोडबंदर येथील न्यु होरायझन एज्युकेशन सोसायटी या संस्थेने ढापला आहे. असा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. त्यामुळे या परिसरात मैदान नसल्याने लहान मुलांना रस्त्यावर खेळावे लागते. तसेच नागरिकांना सकाळ - संध्याकाळ फेरफटका मारण्यासाठी रस्त्यावरील धुळीत चालावे लागते. एकीकडे बच्चे कंपनीच्या ऑनलाईन खेळावरून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण असतानाच परिसरातील मैदानावर खासगी शाळांचा 'खेळ' सुरु असेल, तर मनसेकडून उग्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना निवेदन देत, पालिका प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी, अन्यथा न्यायालयीन लढाई लढण्यास मनसे सज्ज असल्याचेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ठामपाच्या मंजूर विकास आराखड्यानुसार वसंत लॉन्सजवळील न्यू होरायझन स्कॉलर्स स्कूलशेजारी ६६०० चौमी क्षेत्रफळाचे खेळाचे मैदान नियोजित आहे. या मैदानाला शाळेने संरक्षित भिंत उभारून ते बंदिस्त केले आहे. याप्रश्नी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी वर्षभरापूर्वी आवाज उठवला होता. याबाबत पालिकेने मैदान खुले करण्याचे आदेश दिले. मात्र संबंधित संस्थेने तत्काळ महापालिकेविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे दुर्दैवाने परिसरातील मुलांना अद्यापही मैदानाचा वापर करता येत नाही आहे. हा मुद्दा चर्चेत असतानाच पालिका प्रशासनाच्या नियमावलीला

### उच्च न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली

***खेळाच्या मैदानाबाबत उच्च न्यायालयाने देखील वेळोवेळी सार्वजनिक मालमत्ता असल्याने खाजगी वापर करता येणार असा निर्वाळा दिलेला आहे. मात्र या प्रकरणात त्या आदेशाची पायमल्ली करण्यात आली असून शाळेच्या अशा मनमानी कारभारावर पालिकेने कारवाई करावी, असे संदीप पाचंगे यांनी सांगितले.***

त्याच शैक्षणिक संस्थेने दुसऱ्या ठिकाणी देखील वाटाण्याच्या अक्षता लावल्याचा प्रकार समोर आला आहे. घोडबंदर रोड येथील हिरानंदानी स्पेशल टाऊनशिपमध्ये ठाणे शहराच्या मंजुर विकास योजनेतील सेक्टर ५ मधील स.नं. १८० पै., १८१ पै, २१९ पै., २७९ पै, व १८९ पै या जमिनीवर प्राथमिक, माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण क्र. २ चे एकुण १४४००.०० चौ.मी. क्षेत्र होते. या आरक्षित क्षेत्रावर ठाणे महानगरपालिकेने इतर आरक्षित शाळेचे क्षेत्र एकत्रित करून शाळा इमारतीचे बांधकाम आराखडे मंजुर केले आहेत. शाळेच्या इमारतीमध्ये न्यु होरायझन एज्युकेशन सोसायटी या संस्थेने इंटरनॅशनल स्कुल सुरू केले असून संस्थेने शाळेच्या इमारतीच्या सभोवताली भिंत बांधली त्यामुळे मैदानावर सर्वसामान्य नागरिकांना प्रवेश मिळत नसल्याने खेळाचे मैदानावर शैक्षणिक संस्थेचा पुरता कब्जा झाला आहे. याबाबत पाचंगे यांनी ठामपाआयुक्त अभिजित बांगर यांच्याशी पत्रव्यव्हार केला असून मैदान स्थानिकांच्या हक्काचे आहे. ते लवकरात लवकर खुले करावे, अशी मागणी केली आहे.

# फॉरवर्डच्या काळात शब्दांशी नातं तुटतंय : उपाध्ये

**वसंतराव डावखरे व्याख्यानमालेत बद्रिके, म्हात्रे प्रथम**




**ठाणे:** सध्या फॉरवर्डच्या काळात तरुण पिढीचे शब्दांशी नात तुटत आहे. दिवंगत वसंतराव डावखरे यांच्या नावाने होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धांच्या माध्यमातून पुन्हा शब्दांशी नाते जोडले जाईल, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी व्यक्त केले. दरम्यान, कै. वसंतराव डावखरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत वरिष्ठ गटात पराग बद्रिके व कनिष्ठ गटात अनन्या म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावून प्रत्येकी दहा हजार रुपयाचे बक्षीस जिंकले.

विधान परिषदेचे माजी उपसभापती दिवंगत वसंतराव डावखरे यांच्या जयंतीनिमित्ताने समन्वय प्रतिष्ठानतर्फे ठाण्यातील के. बी. पी. महाविद्यालयात भरविलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचा मंगळवारी समारोप झाला. आमदार निरंजन डावखरे, माजी खासदार संजीव नाईक, भाजपाच्या प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक आणि प्रदेश प्रवक्ते केशवजी उपाध्ये यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. या वेळी महापालिकेतील माजी गटनेते मनोहर डुंबरे, प्रसिद्ध लेखक शिरीष लाटकर, भाजपाचे शहर सरचिटणीस विलास साठे, मनोहर सुगदरे, सचिन मोरे आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, हर्षदा बोरकर, निर्मोही फडके, मंदार टिल्लू आदींनी काम पाहिले. या स्पर्धेत वरिष्ठ गटात यश पाटील याने द्वीतीय, श्रुती बोरस्तेने तृतीय आणि विवेक वारभुवन याने उत्तेजनार्थ बक्षीस जिंकले. तर कनिष्ठ गटात द्वितीय क्रमांकावर रागिणी भोसले, तृतीय क्रमांकावर प्रियांका दळवी आणि उत्तेजनार्थ म्हणून मनस्वी माने यांना बक्षीस देण्यात आले.

उत्तम वक्तृत्वासाठी सातत्याने नवनवीन लोकांबरोबर बोलत राहिले पाहिजे. बोलण्याबरोबरच दुप्पट वाचले पाहिजे. तर पाच ते सहापट ऐकले पाहिजे. वक्तृत्वासाठी आत्मविश्वासही महत्वाचा असून, शब्दांची मांडणीही योग्य पद्धतीने करावी, अशी सुचना उपाध्ये यांनी तरुणांना केली. प्रत्येक भाषणाच्या वेळी आपल्या समोर जनसमुदाय कोणत्या पद्धतीचा आहे. ते ध्यानात घेण्याबरोबरच सखोल अभ्यास करून भाषण करावे. अशा पद्धतीने तुम्हा वक्तृत्वात यश मिळेल, असे उपाध्ये यांनी सांगितले.

महाविद्यालयातील तरुण-तरुणींना मनातील विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ देण्याचा मुख्य उद्देश ठेवून स्पर्धा भरविण्यात आली होती. उत्तम वक्तृत्वाच्या माध्यमातून मुलांना भविष्य घडविता येऊ शकते. यापुढील काळातही समन्वय प्रतिष्ठानतर्फे तरुणांच्या प्रगतीसाठी स्पर्धांसह विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे आमदार निरंजन डावखरे यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी संजीव नाईक, माधवी नाईक यांचीही भाषणे झाली. आकाश राऊत यांनी सुत्रसंचालन व स्पर्धेचे नियोजन केले.

# आता होणार वर्षातून चार वेळा मतदार नोंदणी

## आगाऊ नाव नोंदणीचीही सुविधा उपलब्ध

**ठाणे :** मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी आतापर्यंत वर्षातून एकच १ जानेवारी हा अर्हता दिनांक असायचा. म्हणजे १ जानेवारी किंवा त्या आधी १८ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांना मतदार नोंदणी करता यायची. मात्र २०२३ पासून जानेवारी, एप्रिल, जुलै आणि ऑक्टोबर या महिन्यांच्या एक तारखेला किंवा त्याआधी ज्या नागरिकांची अठरा वर्षे पूर्ण होतील, त्यांना ९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर २०२२ या विशेष मोहिमेअंतर्गत आगाऊ मतदार नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील युवा मतदारांनी तसेच आतापर्यंत मतदार यादीत नाव नोंदणी न केलेल्या नागरिकांनी नाव नोंदणी करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

निवडणुका पारदर्शक आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार याद्याचे अद्ययावतीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण असते. ही यादी निर्दोष व परिपूर्ण असावी, यासाठी जिल्हा निवडणूक कार्यालय प्रयत्नशील असते. ठाणे जिल्ह्यातील प्रारुप मतदार यादी ९ नोव्हेंबर रोजी मतदार नोंदणी कार्यालयामध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. मतदारांनी आपले नाव, पत्ता, लिंग, जन्मदिनांक, वय, ओळखपत्र क्रमांक, मतदारसंघ इ. तपशील मतदार यादीत तपासून ते अचूक आहेत का याची खात्री करणे आवश्यक आहे. अनेकदा ऐन मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीत नाही, अशी तक्रार अनेक मतदाराकडून केली जाते. त्यामुळे मतदारांनी प्रारूप मतदार यादीतील आपले तपशील आत्ताच तपासणे महत्त्वाचे आहे, असे शिनगारे यांनी सांगितले.

९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर २०२२ या कालावधीत विशेष पुनरिक्षण कार्यक्रम सुरू झाला आहे. या कालावधीत मतदार नोंदणीबरोबरच एखाद्याच्या नावासंबंधी हरकती घेता येणार आहे.

# आगीत मीटर केबल जळाली

ठाणे: कळवा - खारेगाव येथील इमारत सया पार्क फेज क्रमांक-२ या इमारतीच्या तळ मजल्यावरती असलेल्या मीटर बॉक्स रूममधील मीटर बॉक्स केबलला किरकोळ आग लागली. हा प्रकार बुधवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास समोर आला. घटनेची माहिती मिळताच, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, टोरंटचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. लागलेल्या आगीवर तातडीने नियंत्रण मिळविण्यात आले.या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# ठाण्याच्या श्रद्धाची 'कांस्य'मय किक

**ठाणे:** धुळे, देवपूर येथे ४,५,६ नोव्हेंबर दरम्यान पार पडलेल्या ४९ व्या महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर व कॅडेट ज्यूदो स्पर्धा व निवड चाचणी स्पर्धेत ठाण्याच्या श्रद्धा भोला गिरी हिला ६३ किलो वजनी गटात कांस्यपदक समाधान मानावे लागले आहे. या स्पर्धेत तिने रत्नागिरी आणि जळगाव येथील प्रतिस्पर्धींना हरवले. श्रद्धा ही ठाण्याच्या नौपाडा येथील सरस्वती क्रीडा संकुलात प्रशिक्षक देवीसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली जुदो चा सराव करीत आहे.

